# दिनांक 09/03/2025

**1** महाड शहर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 07/03/2025 रोजी 22:30 वा च्या सुमारास मौजे नवेनगर शुभांगी हॉटेल नवेनगर जवळ व फिर्यादी यांच्या घरा समोर नवेगर ता.महाड येथे 08 आरोपीत यांनी एकत्र जमाव जमवुन फिर्यादी तसेच फिर्यादी यांचे भाउ यास हाताबुक्यानी मारहाण केली व भांडणे सोडविण्यास फिर्यादी यांचे भाउ हे आले असता त्यांना देखिल आरोपीत यांनी मिळुन हाताबुक्यांनी मारहाण केली तसेच फिर्यादी यांचे घरासमोर आरोपीत क्र 1 ते 8 हे येवुन त्यांनी दंगा करुन फिर्यादी यांचे पत्नीस हाताबुक्यानी मारहाण करुन जमिनीवर ढकलुन दिले फिर्यादी यांची आत्या हिला देखिल हाताने मारहाण केली तसेच फिर्यादी यांचे सासुचा ब्लाउज फाडला फिर्यादी यांचे भावाची पत्नी हिचा ड्रेस फाडला त्यामुळे त्या दोघींच्या मनास लज्जा उत्पन्न झाली. सदर गुन्ह्यातील 04 आरोपीत यांना दिनांक 08/03/2025 रोजी 15:35 वा च्या सुमारास अटक करण्यात आली आहे.

याबाबत महाड शहर पोलीस ठाणे येथे गु.र.नं.20/2025, भारतीय न्याय संहीता 2023 74,189(2),190,191,115(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मसपोनि/स्मिता राउत हे करीत आहेत.

**2**. खोपोली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 09/01/2025 रोजी 17:43 वा ते दि.17/01/2025 रोजी 17:43 वा च्या दरम्यान मौजे मोहन रॉकी मोहनवाडी खोपोली ता.खालापुर येथे फिर्यादी यांचे कंपनीत फायनान्स जनरल मॅनेजर या पदावर काम करणारे आरोपीत नं.01 यांनी मोहन रॉकी या कंपनीत नोकरीच्या ठिकाणी हजर असताना श्री.विनय मोहन असे बनावट नांव धारण करणा-या व्यक्तीसोबत संगनमत करुन त्यांचा मोबाईल क्रमांक 8238045969 यावर त्या अनोळखी व्यक्तीने त्याचा मो.क्र.7758843174 यावरुन व्हॉटस्अँप द्वारे मेसेज पाठवून तो मोहन रॉकी या कंपनीचा एम.डी.श्री.विनय मोहन असल्याचे भासवून हा त्याचा नवीन मोबाईल नंबर असल्याचे सांगून त्यावर व्हॉटस्अँप द्वारे वेळोवेळी चॅटिंग करुन, वेळोवेळी वेगवेगळया बँक खात्यांची माहीती पाठवून सदर अनोळखी व्यक्तीने मागणी केल्याप्रमाणे त्यावर एकुण 5,50,00,000/- रुपये (साडे पाच कोटी रुपये) एवढी रक्कम कंपनी व्यवस्थापनाची किंवा कंपनीचे एम.डी.श्री.विनय मोहन यांची कोणतीही पुर्व परवानगी न घेता अगर या दरम्यान त्यांना ह्या आर्थिक व्यवहाराबाबत कोणतीही माहिती न देता स्वत:च्या आर्थिक फायदयाकरीता पाठवून दिली व सदरची बाब उघडकीस आल्यानंतर ऑनलाईन फ्रॉड झाला आहे असे भासवून नॅशनल सायबर

क्राईम रिपोर्टींग पोर्टलच्या 1930 या हेल्पलाईन क्रमांकावर फोन करुन ऑनलाईन तक्रार क्र. 31901250011211 अशी दिनांक 17.01.2025 रोजी नोंदवली. त्यानंतर लिन झालेली 1,21,29,674/- रु. एवढी रक्कम कंपनीचे बँक खात्यावर परत वळती झाली व कंपनी व्यवस्थापनाचे बँक अकाऊंट क्रमांक 148005001436 ह्यावरील उर्वरित 4,28,70,326/- रुपये ईतक्या रकमेचा कंपनीचा विश्वास संपादन करुन त्याच्या अनोळखी साथीदारांच्या मदतीने अप्रामाणिकपणे अपहार केला म्हणून फिर्यादी यांची कंपनीचे फायनान्स जनरल मॅनेजर या पदावर काम करणारे आरोपी नं.01, सध्या रा.फ्लॅट नं 3, बिल्डींग नं.01, शक्ती सोसायटी, लक्ष्मी नगर, खोपोली, ता.खालापुर, जि.रायगड, मुळ रा. 5, डि व्ही 109, ई एलआयजी फ्लॅट्स, हरी नगर, नवी दिल्ली-110064 यांचेविरुध्द तसेच त्यांचे अनोळखी साथीदार यांच्याविरुध्द कायदेशीर तक्रार आहे.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे येथे गु.र.नं.72/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 316(4),3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/अभिजित व्हरांबळे हे करीत आहेत.

**3.** अलिबाग पोलीस ठाणे हदीत दिनांक 15/01/2025 रोजी 00:00 वा ते दि. 08/03/2025 रोजी 00:00 वा च्या दरम्यान मौजे लक्ष्मी व्हिला, बी विंग, रु नं.05, दत्त मंदिर मागे ब्राम्हणआळी येथील फिर्यादी यांचे राहते घरी शेरखान एडगे ॲपवरुन फिर्यादी यांना शेअर खरेदीत फायदा झाल्याचे भासवुन शेरखान एज ॲपचा सीआयओ आरोपी क्र.1 शेरखान एज ॲप कस्टमर सर्विस मॅनेजर आरोपी क्र.2 व व्हिआयपी शेरखान बाजार या व्हॉट्सॲप ग्रुपवरील आरोपी क्र.3 यांनी फिर्यादी यांचे कडुन एकुण 9,31718/- रुपये ॲपचे माध्यमातुन उकलुन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे त्या प्रमाणे सेम नावाच्या ॲपवरुन आरोपी क्र.4 व आरोपी क्र.5 यांनी फिर्यादी यांना शेअर खरेदीत फायदा झाल्याचे भासवून फिर्यादी यांचे कडुन एकुण 3,00,000/- रुपये ॲपचे माध्यमातुन उकलुन फिर्यादी यांची एकुण 12,31,718/- रुपये एवढया रक्कमेची फसवणुक केली आहे.

याबाबत अलिबाग पोलीस ठाणे येथे गु.र.नं.40/2025 माहिती तंत्रज्ञान अधिनियम, 2000 (2008 चे सुधारणेसह) 66 (D), भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 318 (4),3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोनी/किशोर साळे हे करीत आहेत.

**4.** खालापूर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 25/01/2025 रोजी 00:00 वा च्या सुमारास मौजे पिडीत हिच्या राहत्या घरी कलोते रयती, आदीवासीवाडी ता.खालापूर येथे आरोपीत याने पिडीत महीला ही मुकबधीर असल्याचा फायदा घेवून रात्रीच्या वेळी खिडकीतून तिच्या घरात प्रवेश करून तिला जिवेठार मारण्याची धमकी देवून तिच्या इच्छेविरूदध वारंवार बलात्कार करुन तिला गरोदर केले.

याबाबत खालापूर पोलीस ठाणे येथे गु.र.नं.77/2025, भारतीय न्याय संहीता 2023 चे कलम 64 (2) (के),331(4),351(2)(3 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास

सपोनी/संतोष आवटी `हे करीत आहेत.

**5.** पोलादपूर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 08/03/2025 रोजी 15:45 वा च्या सुमारास मौजे लोहारे गावाच्या हददीत एअरटेल टॉवर येथे ता.पोलादपूर येथे अज्ञात आरोपीत याने एकूण 12,000/-रुपये किंमतीचा एचबीएल कंपनीचा 24 बॅटरी सेल हे घटनास्थळ येथील एअरटेल टॉवर आयडी नं.1281747 यावरून स्वत:चे फायदयाकरीता लबाडीच्या हेतूने चोरून नेले

याबाबत पोलादपूर पोलीस ठाणे येथे गु.र.नं.13/2025, भा.न्याय.संहिता 303(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/सर्तीश पवार हे करीत आहेत.

**6**. नागोठणे पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 03/03/2025 रोजी 14:30 वा ते दि. 08/03/2025 रोजी 14:30 वा च्या दरम्यान मौजे फिर्यादी याचे घरी मौजे जाभुळटेप मानी,पो बेणसे ता.पेण येथे फिर्यादी यांचे राहते घरामध्ये कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीच्या संमतीशिवाय लबाडीच्या हेतुने स्वत:चे फायदयाकरीता फिर्यादी यांचे घराचा उघडे दरवाजावाटे लोखंडी कपाटातील स्टिलच्या पेटीतील एकूण 53,000/-रुपये किमतीचे दागीने पेटीसह फिर्यादी यांचे संमतीशीवाय स्वत:चे फायदयाकरीता चोरी करून नेले.

याबाबत नागोठणे पोलीस ठाणे येथे गु.र.नं.15/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 305 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोह/संगीता सानप हे करीत आहेत.

**7.** महाड शहर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 07/03/2025 रोजी 22:00 वा च्या सुमारास मौजे जय अंबे कॉर्नर,कुणबी आळी कमानी जवळ नवेनगर महाड येथे आरोपीत क्र.01,02,03, व 04 सर्व रा.महाड यांनी संगनमत करुन 02 साक्षीदार यांना मारत असताना त्यांना सोडविण्याकरीता 03 साक्षीदार हे सोडविण्यास गेले असता आरोपीत क्र.01 ते 04 यांनी साक्षीदार यांना शिवीगाळी करुन हाताबुक्यांनी मारहाण करीत असताना तिथे महिला फिर्यादी हे सोडविण्यास गेले असता आरोपीत क्र 03 यानी तक्रारदार यांना ओढुन मादरचोद तुझ्या गांडीत पाय घालतो असे बोलुन फिर्यादी यांचा ब्लाउज ओढुन फिर्यादी चे गळयातील सोन्याची चैन ओढली गेली व फिर्यादीचा ब्लाउज ओडुन फाडुन फिर्यादीचे मनास लज्जा उत्पन्न केली व आरोपीत क्र 04 ते 07 हे फिर्यादी व साक्षीदार यांना बघुन यांना कापुन टाका असे बोलुन आरोपी क्र 06 यांनी त्याचे हातातील काठीने फिर्यादीचे मुलाचे डोक्यात मारत असताना ती काठी महिला साक्षीदार यांचे उजव्या हाताचे पंजाला लागुन दुखापत झाली तसेच आरोपीत क्र.03 यांनी त्याचे हातातील काठीने साक्षीदार यांस मारत असताना सदर ची काठी महिला ही मध्ये आली असता तिचे उजव्या हातावर काठीचा मार लागुन दुखापत झाली.

याबाबत महाड शहर पोलीस ठाणे येथे गु.र.नं.21/2025, भारतीय न्याय संहीता 2023 चे कलम 74,189(2),190,191,115(2),118(1) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मसपोनि/स्मिता राउत हे करीत आहेत.

**8.** महाड एम.आय.डी.सी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 08/03/2025 रोजी 19:15 वा च्या सुमारास मौजे काळीज गावचे हददीत एमएमए मैदानाचे समोर काळीज वाळण रोडवर येथे आरोपीत रा.सरमकुंडी ता.वाशी जि.धाराशीव सध्या रा.सुतारआळी नवेनगर ता.महाड याने त्याचे ताब्यातील एसटी बस नं.एमएच-20-बीएल-3799 ही काळीज बाजूकडून वारंगी बाजूकडे घेवून जात असताना सदरची बस ही अतिवेगाने हयगयीने बेदरकारपणे चालवून रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करून वाळण बाजूकडून काळीज बाजूकडे जाणारे हिरो पॅशन मोटरसायकल नं एमएच 06 बीवाय 9970 यास ठोकर मारून अपघात करून मोटरसायकलवरील चालक राजेंद्र लक्ष्मण जाधव यांचे लहान मोठया स्वरूपाच्या दुखापती होवून त्यांचे मरणास कारणीभूत झाला

याबाबत महाड (एम.आय.डी.सी.)पोलीस ठाणे येथे गु.र.नं 24/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 184, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 106(1), 281,125(a),125(b) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/पवार हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 08.03.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 363 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 3,53,400/-रुपये इतका दंड आकारला आहे.